स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्याशाखा अंतर्गत

मराठी विषयातील पीएच.डी.पदवी करिता सादर

करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधन विषय

बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिचित्रणे: एक चिकित्सक अभ्यास

संशोधक

स्वाती अशोकराव नवरे

मराठी विभाग

श्री सरस्वती भुवन प्रशाला, कुंभार पिंपळगांव

ता. घनसावंगी जि. जालना

मार्गदर्शक

डॉ. पंढरीनाथ नारायणराव धोंडगे

मराठी विभाग

ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर जि. परभणी

बी.रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिचित्रणेः एक चिकित्सक अभ्यास

प्रास्ताविक :

कथा, कविता, नाटक व कादंबरी असे स्थूल मानाने चार मुख्य वाङ्मय प्रकार मानले जातात. लयबध्द शब्दरचना हे काव्याचे अंगभूत वैशिष्टये होय. नाटय वाङ्मय प्रकार रंगभूमीशी निगडीत असल्यामुळे त्यात एक प्रकारची शिस्त असते. कथा हा वाङ्मय प्रकार विशिष्ट घटना, प्रसंगापुरताच मर्यादीत असतो.

कादंबरी वाङ्मय प्रकार जीवन प्रवाहाबरोबर चालणारा, वाढणारा व सतत बदलत जाणारा वाङ्मय प्रकार आहे. हा वाङ्मय प्रकार निवेदनप्रधान असल्यामुळे त्याच्या आशयाचा पट व्यापक व विस्तृत असतो. विविध घटना, कथानक, व्यक्तिचित्रणे, निवेदन, निवेदनशैली अशा घटकांनी संरचना उभी राहत असते.

कादंबरी वाङ्मय प्रकार हा सर्वसमावेशक, व्यापक व परिपूर्ण विवेचन करणारा आहे. कादंबरीत कथनाला विशेष महत्त्व असते. कादंबरीत कथात्मकता ही गद्य स्वरुपाची असते. कादंबरीला विषयाची मर्यादा नसते. कादंबरी ही जीवन व्यवहाराचे व्यापक स्वरुपात दर्शन घडविते. घटना, व्यक्ती व वातावरण इत्यादी घटकांच्या सहाय्याने मानवी जीवनाचे वास्तववादी विविध स्तरीय व व्यामिश्र स्वरुपाचे दर्शन कादंबरी घडविते.

मानवी जीवनातील विविधता आणि गुंतागुंत यांचा तळ शोधण्याची क्षमता कादंबरी या वाङ्मय प्रकारामध्येच आहे. मानवी जीवन खऱ्या अर्थाने समजून घेण्याची शक्यता जर कोणत्या वाङ्मय प्रकारात असेल तर ती कादंबरी या वाङ्मय प्रकारातच आहे. म्हणून जीवनाच्या विविध अंगांचे दर्शन घडविणारा कादंबरी हा वाङ्मय प्रकार झपाटयाने लोकप्रिय झाला.

कादंबरीला आज एक प्रधान वाङ्मय प्रकार म्हणून जागतिक मान्यता मिळालेली आहे. मात्र कादंबरीला लोकप्रियता लाभलेली असली तरी तिचा विकास प्रथमतः पाश्चात्य देशांमध्येच झाला आहे. या देशात नाटक आणि कविता या वाङ्मय प्रकारांप्रमाणे कादंबरीला शतकानुशतकाची दीर्घ

परंपरा नाही. खऱ्या अर्थाने अठराव्या शतकातच कादंबरीचे रूप उत्क्रांत झाले आणि एकोणीसावे शतक उलटण्यापूर्वीच एक प्रधान वाङ्मय प्रकार म्हणून कादंबरीला प्रतिष्ठा लाभली.

बाबा पद्मनजी यांची 'यमुना पर्यटन' (१८५७) ही मराठीतील पहिली सामाजिक, वास्तववादी व समस्याप्रधान कादंबरी होय. किंबहुना भारतीय भाषेमधील ती पहिली ग्रामीण कादंबरी मानली जाते. या पहिल्या कादंबरीने मराठी कथनपर गद्याला ऐहिकाचे व समकालीन वास्तवाचे संदर्भ पुरविले आहेत. या कादंबरीतील विधवा स्त्री पात्रे प्रत्यक्ष पाहणी करून व माहिती मिळवून निर्माण केली आहेत.

या कादंबरीने सुरू केलेली परंपरा फार लवकर विकसित व रसिकमान्य झाली. याच काळात रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांची 'मोचनगड' , लक्ष्मणशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' या महत्तवपूर्ण कादंबऱ्यांनी मराठी कादंबरीचे विश्व समृध्द केले.

त्यानंतर मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून 'बळीबा पाटील' व 'पिराजी पाटील' या दोन्हींमध्ये पहिली कादंबरी कोणती हा जरी वाद असला तरी 'बळीबा पाटील' ही पहिली ग्रामीण कादंबरी समजून त्यामध्ये शेतकऱ्यांना सहजरित्या मार्ग सूचवून आपली सुधारणा करून घेता यावी हाच उद्देश बाळगून या पुस्तकाची रचना करण्यात आली. त्यानंतर रा.रं.बोराडे, भास्कर चंदनशीव, वासुदेव मुलाटे, आनंद यादव, शंकर पाटील इत्यादी लेखकांनी मोठया प्रमाणात कादंबरी लेखन केले आहे.

अभ्यास विषयाची निवड :

मला लहानपणापासून वाचनाची आवड होती. महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असताना मी कथा, कादंबरी हे वाङ्मय प्रकार वाचू लागले. मी एक ग्रामीण भागातील रहिवासी असून माझ्या कुटुंबाचा मुख्य व्यवसाय शेती आहे. त्यामुळे मला ग्रामीण खेडी, शेती, जाती-पाती, निसर्ग, पशू-पक्षी, प्राणी यांच्याबद्दल नेहमीच अप्रूप आणि जिव्हाळा होता. महाविद्यालयीन शिक्षण घेताना या ग्रामीण भागाशी मी एकरूप झालेले होते. आपल्या भागातील कादंबरीकांनी लिहिलेल्या कादंबऱ्या मी वाचू लागले व नकळतच त्यांच्याविषयी माझ्या मनात कुतुहलाची भावना निर्माण झाली.

मराठवाडा हा ग्रामीण साहित्याचा केंद्रबिंदू आहे. १९६० नंतर मराठवाडयातील ग्रामीण कांदबरीकारांनी बऱ्याच कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. यामध्ये काही कादंबरीकारांचा उल्लेख केल्याशिवाय एकूणच मराठी साहित्याचा आढावा पूर्ण होऊ शकत नाही. यामध्ये बी. रघुनाथ यांनीही दर्जेदार कादंबऱ्यांचे लेखन केलेले आहे. त्यांच्या कादंबऱ्यांवर संशोधन करून विस्तृत प्रमाणात आपण काही तरी लिहावे, असे मला मनोमन वाटले. म्हणून हा विषय मी माझ्या शोध प्रबंधासाठी निवडला.

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये बी. रघुनाथ यांच्या 'ओ', 'हिरवे गुलाब', 'बाबू दडके', 'उत्पात', 'म्हणे लढाई संपली', 'जगाला कळलं पाहिजे', 'आडगावचे चौधरी' या कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास करण्याचे मी ठरविले आहे.

शोधप्रबंधाची गृहितके:

१) कादंबरी ही देशी संकल्पना नसून ती पाश्चात्यांकडून आयात झालेली आहे.

२) समकालीन वाङ्मय आणि सामाजिक वातावरणाचा प्रभाव बी. रघुनाथ यांच्या कादंबरीवर दिसून येतो.

३) मध्यमवर्ग आणि शहर यांच्यापासून दूर असलेल्या ग्रामीण जीवनातील सुख-दुःखात्मक प्रसंगांचे आणि भोवतालच्या परिस्थितीचे चित्रण इत्यादी विविध विषयांवर बी. रघुनाथ यांच्या कांदबऱ्या भाष्य करतात.

४) बी. रघुनाथ यांची भाषाशैली वैशिठयपूर्ण आहे.

५) निजाम राजवटीत सामान्य माणसांवर जे अन्याय-अत्याचार झाले त्याचे चित्रण बी. रघुनाथांच्या कादंबऱ्यांतून दिसून येते.

६) बी. रघुनाथांच्या कादंबऱ्यांतून प्रादेशिकता दिसून येते.

७) बी. रघुनाथांच्या कादंबऱ्यांतून प्रभावी व्यक्तिचित्रणे रेखाटली आहेत.

शोधप्रबंधाची उद्दिष्टये:

१) ग्रामीण कादंबरी ही संकल्पना स्पष्ट करणे.

२) बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांतील आशय आणि विषय वैविध्यांचा शोध घेणे.

३) बी. रघुनाथांच्या कादंबऱ्यांतील प्रादेशिकता, ग्रामीण जीवन अभ्यासणे.

४) बी. रघुनाथांच्या लेखनातील प्रादेशिक आणि समाजवास्तवाचा शोध घेणे.

५) बी. रघुनाथ यांच्या कांदबऱ्यांतील कृषिनिष्ठ जाणिवा शोधणे.

६) समकालीन वाङ्मयीन वातावरणात बी. रघुनाथ यांचे अस्तित्व सिध्द करणे.

७) बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तीचित्रणांचा अभ्यास करणे.

८) बी. रघुनाथांच्या कादंबऱ्यांमधून प्रतिबिंबीत होणाऱ्या स्त्रीच्या जीवनसंघर्षाचा अभ्यास करणे.

९) बी. रघुनाथांच्या कादंबऱ्यांमधील भाषिक वैशिष्ठयांचा शोध घेणे.

शोधप्रबंधाची व्याप्ती:

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये प्रामुख्याने बी. रघुनाथ यांच्या 'ओ', 'हिरवे गुलाब', 'बाबू दडके', 'उत्पात', 'म्हणे लढाई संपली', 'जगाला कळलं पाहिजे', 'आडगावचे चौधरी' या सात कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने कादंबऱ्यांचे कथासूत्र, पात्रे, कथन पद्धती, ग्रामीण जीवन, शेती, नातेसंबंध, रितीरिवाज, रूढी-परंपरा, वातावरण, कथानक, वाद-विवाद, व्यवसाय, भाषाशैली, व्यक्तिचित्रणे, लेखकाचा सामाजिक दृष्टिकोन तसेच वाङ्मयीन वैशिष्टये इत्यादी बाबींचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन पध्दती:

बी. रघुनाथा यांच्या कादंबऱ्यांचे आकलन आणि विश्लेषण करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्याच्या संदर्भात अवलोकन, आकलन आणि विश्लेषण या पध्दतीने मी संशोधन करायचे निश्चित केले आहे. ग्रामीण साहित्य म्हणून साहित्यकृतींच्या संदर्भात सामर्थ्य

आणि मर्यादा दाखवून देणेही संशोधनास पूरक ठरणार आहे. एकूण मानवी जीवनाच्या संदर्भात बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्या किती सक्षम आहेत याचे विश्लेषणही यामध्ये येईल. त्याचबरोबर त्यांच्या मर्यादांचाही विचार केला जाणार आहे. प्रस्तुत शोधप्रबंधाच्या विषयाचे अभ्यासपूर्वक विवेचन,विश्लेषण करून संशोधन करताना आस्वादात्मक पध्दती, चिकित्सक पध्दती, वर्णानात्मक पध्दती, मनोविश्लेषणपर आकलन पध्दती आणि संशोधनासाठी गरजेच्या ठरणाऱ्या इतर अभ्यास पध्दतींचा अवंलब करण्यात येईल.

या शोधप्रबंधाच्या प्रकरणांची रचना सारांशाने पुढीलप्रमाणे करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले - मराठी कादंबरीची परंपरा, स्वरूप आणि विशेष
प्रकरण दुसरे - बी. रघुनाथ यांच्या कादंबरी लेखनाचे स्वरूप
प्रकरण तिसरे - बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांतील ग्रामजीवन
प्रकरण चौथे - बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिचित्रणे
प्रकरण पाचवे - बी. रघुनाथ यांच्या व्यक्तिचित्रणाचे वेगळेपण
प्रकरण सहावे - बी. रघुनाथ यांच्या कादंब-यांतील भाषाशैली
प्रकरण सातवे - बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांतील वाङ्मयीन विशेष
प्रकरण आठवे - समारोप आणि निष्कर्ष

प्रस्तुत शोधप्रबंधाची प्रकरणनिहाय रूपरेषा पुढीलप्रमाणे राहील.

प्रकरण पहिले - मराठी कादंबरीची परंपरा, स्वरूप आणि विशेष :

प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठी कादंबरीची संकल्पना, कादंबरी वाङ्मयाचा इतिहास, विविध विचारवंतांच्या व्याख्यांच्या आधारे स्पष्ट केले जाणार आहे. तसेच कादंबरीचे स्वरूप, कादंबरीचा आशय, अभिव्यक्ती, वातावरण निर्मिती, भाषाशैली, व्यक्तिचित्रणे इत्यादी घटकांच्या माध्यमातून कादंबरी वाङ्मय प्रकाराचे विशेष देखील नोंदवले जाणार आहेत.

मराठीमध्ये कादंबरी हा वाङ्मय प्रकार जेव्हापासून आला तेव्हापासून ते आजपर्यंत मराठी कादंबरीच्या परंपरेचा थोडक्यात आढावाही सदरील प्रकरणामध्ये घेतला जाणार आहे.

प्रकरण दुसरे - बी. रघुनाथ यांच्या कादंबरी लेखनाचे स्वरूप :

बी. रघुनाथ यांच्या कादंबरी लेखनाचे स्वरूप स्पष्ट करणे हा प्रस्तुत प्रकरणातील मुख्य विषय आहे. निजामी राजवटीखालच्या मराठवाडयातील मध्ययुगीन संस्थांनी जीवनाचे चित्रण बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांत आलेले आहे. बी. रघुनाथ यांच्या कादंबरी लेखनाच्या विकासातला हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

बी. रघुनाथ यांनी आपल्या कांदबऱ्यांमधून भिन्न धर्मीयांची सत्ता, संरजामशाही, धर्मद्वेष, राजकीय, सामाजिक, आर्थिक, असुरक्षिततेत जगणारी प्रजा, युध्दात होरपळलेली सामान्य जनता, स्वातंत्र्याची आकांक्षा, आपले सत्त्व टिकवण्याची धडपड करणारी माणसं, अनियंत्रित भोगलालसा इ. विविध पैलूंसह जनजीवन रेखाटलेलं आहे.

'जगाला कळलं पाहिजे' या कादंबरीत मुख्यत: दोन जमातींमधील धार्मिक ताणतणावांचे चित्रण आलेले आहे. मध्ययुगीन, संस्थांनी जीवनशैली भोगविलासाच्या कृत्यांतून प्रकट होते. या दोन्हींची गुंफण 'हिरवे गुलाब' मध्ये झालेली आहे. बी. रघुनाथ यांची 'ओ' ही कादंबरी पत्रात्मक आहे. याउलट परीस्थिती 'उत्पात' आणि 'बाबू दडके' या कादंबऱ्यांबाबत दिसते. वामन रांजणीकर आणि बाबू दडके या दोन व्यक्तींचे जीवनचित्र या कादंबऱ्यांमधून रेखाटले आहे. 'म्हणे लढाई संपली' या कादंबरीत जागतिक युध्दाचे सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन जगण्यावर होणारे परिणाम दाखविले आहेत. पहिल्या भागात गरीब व कष्टकरी वर्गाचं जीवन, दुसऱ्या भागात सरकारी आणि सावकारी जुलूम तर तिसऱ्या भागात हताश सामान्यांचं स्वागत आहे. 'आडगावचे चौधरी' या कांदबरीमध्ये चौधरी घराण्याच्या अनेक पिढया आहेत. जुलमी, क्रूर, भ्रष्ट, संपत्तीची अनिवार लालसा असलेल, ऐषआरामाची आवड असलेले, जहागिरीवर जगणारे, वाटेल त्या हिकमती लढवून संपत्ती घशात घालणारे चौधरी, त्यांचं घराणं आणि त्याचं सर्व पातळयांवर होणारं पतन याचं चित्रण या कादंबरीत रेखाटलेलं आहे. या सर्व बाबींचा तपशीलवार अभ्यास सदर प्रकरणामध्ये करावयाचा आहे.

प्रकरण तिसरे - बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांतील ग्रामजीवन :

बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांतून चित्रीत होणारा मराठवाडा ग्रामीण व शेतीप्रधान आहे. या परिसरातील माणसांची सुख-दुःखे पिढयान्‌पिढया शेतीशी बांधली गेली आहेत. वारकऱ्यांची दिंडी, उरुस, यात्रा अशा समूह संस्कृतीची जोपासना करणाऱ्या उत्सवांचे वर्णन बी. रघुनाथ आपल्या कादंबरीतून मोठया खुबीने चित्रीत करतात.

व्यक्ती आणि समाज यांच्या भोवतालचा भौगोलिक परिसर, निसर्ग, खेडयातील माणसांचे अज्ञान, त्यांची होणारी फसवणूक, गटबाजीचे राजकारण, शेतातील कामे, पिके, पशु-पक्षी, पहाट, सांजवेळ इत्यादी अनेक छोटया-मोठया घटकांसंदर्भात बी. रघुनाथ हे कादंबरीच्या माध्यमातून भाष्य करतात.

ग्रामीण साहित्यातून व्यक्त होणारा परिसर, त्यातून प्रकटणारे ग्रामवास्तव, व्यक्त होणारे सुख - दुःख, अज्ञान, जीवनानुभव, ग्रामीण संवेदना, अनिष्ठ चालीरिती, रुढी-परंपरा आणि ग्राम जाणिवांना बी. रघुनाथ आपल्या कादंबऱ्यांतून व्यक्त करतात. या सर्व घटकांचा सविस्तरपणे अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

शेजाऱ्यांशी असलेले प्रेमाचे व सलोख्याचे संबंध, भाऊबंदकीतील वैर, हेवेदावे, द्वेष-मत्सर, भांडणतंटे, वाद-विवाद अशा अनेक घटना बी रघुनाथ आपल्या कादंबऱ्यांमधून मांडतात. त्यांचाही अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण चौथे - बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तीचित्रणे :

समाजामध्ये वेगवेगळया वृत्तीप्रवृत्तींची माणसे वावरत असतात. बी. रघुनाथांनी हे वास्तव आपल्या कादंबऱ्यांतून रेखाटले आहे. स्त्री ही उपभोगाची एक वस्तू आहे, अशीच या समाजाची धारणा असावी. या धारणेला छेद देणाऱ्या काही स्त्री प्रतिमा बी. रघुनाथांनी आपल्या कादंबऱ्यांतून चित्रीत केल्या आहेत. 'जाई', (हिरवे गुलाब), 'आकाशी', (बाबू दडके), 'नीला', (उत्पात), 'नगीना', (म्हणे लढाई संपली), 'शीतला', (जगाला कळलं पाहिजे), 'वहिनी', (आडगावचे चौधरी) या स्त्रिया मूल्यभ्रष्ट व्यवस्थेतही आपले स्वत्त्व जपून आहेत. त्यातल्या 'नीला', 'नगीना' यांना

तडजोडी कराव्या लागतात. 'जाई', 'वहिनी' यांसारख्या स्त्रियांना सभोवतीच्या स्थितीचा भेद करता येत नाही. वासनेच्या आणि जातीय विद्वेषांच्या जाळात 'शीतला' बळी जाते. 'आडगावचे चौधरी' या कादंबरीत आपल्या जावयाची संपत्ती गिळंकृत करण्याच्या हेतूने नानासाहेब चौधरी आपला जावई राजाभाऊ याला माडीत महिनो न् महिने कोंडून ठेवतात आणि विविध प्रकारांनी त्याचा छळ करून त्याला आत्महत्त्या करायला भाग पाडतात. सुंदर मुलगी वासनातृप्तीसाठी निर्लज्जपणे विकत घेवू पाहणारे उंबरग्याचे कामांध नबाब 'आडगावचे चौधरी' मध्ये साकारले आहेत. मद्यपानानंतर 'रेशम' या वेश्येवर सामूहिक बलात्कार करून तिला यमसदनाला पाठवणाऱ्या फौजदार, डॉक्टर या व्यक्तीरेखा 'हिरवे गुलाब' मध्ये रेखाटलेल्या आहेत. वेश्या, टांगेवाले, टॅक्सी ड्रायव्हर, हॉटेलातील पोरे, कारकून, पानपट्टीवाले अशा विविध स्तरांतील व्यक्तींचे चित्रण बी. रघुनाथांनी आपल्या कादंबऱ्यांतून केले आहे. त्याचा विस्तृत विचार या प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण पाचवे - बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिचित्रणांचे वेगळेपण :

मराठवाडयातील बी. रघुनाथांच्या कादंबऱ्यांतील सामाजिक जीवन हे संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील इतर प्रांतांप्रमाणे इथेही पुरुषप्रधान संस्कृती प्रत्ययाला येते. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोण कमीपणाचा आहे. तिचे अस्तित्व 'चूल आणि मूल' इथपर्यंतच सीमित ठेवले आहे. स्त्रीला स्वतःचे असे स्वतंत्र अस्तित्व कधीच असत नाही. एवढं प्रचंड वर्चस्व पुरुषांच स्त्रीवर आहे. स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतरही घटनेने दिलेला स्वातंत्र्याचा अधिकार तिला अद्यापही मिळालेला नाही. 'फातेमा'च्या देहाच्या आकर्षणात गुरफटलेल्या 'जानकीराम'चं धर्मांतर हा 'हिरवे गुलाब' या कादंबरीतील महत्त्वाचा भाग आहे. या धर्मांतरानं त्याला नोकरीत बढती मिळणार होती. फातेमाशी सुखाचा संसार थाटून राहता येणार होतं. धर्मांतराच्या प्रक्रियेतून जातानाची त्याची मनःस्थिती बी. रघुनाथांनी संवेदनशीलतेन टिपलेली आहे.

'म्हणे लढाई संपली' ही लहानच पण अत्यंत पक्की गोळीबंद कादंबरी आहे. जागतिक महायुध्द संपलं असलं तरी त्याच्या परिणामातून निर्माण झालेल्या जागतिक मंदीचे आणि अन्न तुटवडयाचे चित्र या कादंबरीत आले आहे. मरण स्वस्त आणि जीवन कसं महाग झालं आहे याचं

हे भेदक दर्शन आहे. बी. रघुनाथांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करतांना स्त्रीचे भावविश्व, तिचे कुटुंबातील आणि समाजव्यवस्थेतील स्थान, स्त्री -पुरुष विषमता, स्त्रीला दिला जाणारा कमी दर्जा या स्त्री व्यक्तीचित्रणांचे वेगळेपण यांचा शोध प्रातिनिधीक स्वरुपात या प्रकरणात मांडण्यात येईल.

प्रकरण सहावे - बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांतील भाषाशैली :

बी. रघुनाथांच्या जीवन जाणिवेचा परिसर परभणी, सातोनाचा असल्याने त्या परिसरातील काही भाषिक विशेष त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये येणे सहाजिकच आहे. भाषा ही खास मानवी संवादाची व्यवस्था आहे. मानवाच्या बाहय व्यवहारासोबतच भाषा ही मनातील आंतरिक व्यवहारही पार पाडते. माणसाच्या मनातील भावभावना व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे भाषा होय.

'ओ' या त्यांच्या पहिल्या कादंबरीवर फडके-खांडेकर यांची बरीच छाप असली तरी बी. रघुनाथांची स्वतंत्र भाषाशैली आपल्या प्रत्ययाला येते. सुरूपचंद्र, आभावती आणि सुमा यांची ही प्रेमकहाणी आहे. या कादंबरीचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे ही कादंबरी संपूर्णपणे पत्रात्मक आहे.

कादंबरीला अनुसरून असलेले स्वभाव रेखाटन, पात्रे, वातावरण, कथानिवेदन हे घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. व्यक्तीतील भाषा संवाद हा त्यांच्या कादंबरीतील भाषाशैलीचा एक अत्यंत महत्त्वाचा विशेष आहे. या अनुषंगाने बी. रघुनाथांच्या कादंबऱ्यांतील वैविध्यपूर्ण भाषाशैलीचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे - बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यातील वाङ्मयीन विशेष :

प्रस्तुत प्रकरणामध्ये बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यांचा आशय, अभिव्यक्ती, वातावरण निर्मिती, भाषाशैली, व्यक्तीचित्रण त्याचबरोबर त्यांच्या कादंबऱ्यांत येणाऱ्या प्रतिमा, प्रतिके, उपमा, दृष्टांत, म्हणी, उखाणे, वाक्प्रचार, प्रादेशिक शब्दकळा इत्यादी घटकांच्या माध्यमातून वाङ्मयीन विशेष शोधले जाणार आहेत.

प्रकरण आठवे - समारोप आणि निष्कर्ष :

प्रस्तुत प्रकरणामध्ये मागील प्रकरणांचा सारांशरूपाने विचार करून थोडक्यात आढावा घेतला जाणार आहे. तसेच सदरील विषयासंदर्भात अभ्यास केल्यानंतर सर्व प्रकरणातून हाती आलेल्या नोंदी निष्कर्षाच्या रुपाने मांडण्यात येणार आहेत.

संशोधन प्रबंधाचा हा स्थूल आराखडा आहे. संशोधनाअंती यात काही प्रमाणात बदल संभवू शकतात. प्रस्तुत शोधप्रबंधातील एखाद-दुसरे प्रकरण बदलू अगर कमी-जास्तही होऊ शकेल.

संदर्भग्रंथसूची

अ.क्र.	लेखकाचे नाव	ग्रंथाचे नाव	प्रकाशन वर्ष	प्रकाशनाचे नाव
१.	इंद्रजीत भालेराव श्रीकांत उमरीकर	समग्र बी: रघुनाथ खंड-३	१९९५	गणेश वाचनालय, परभणी
२.	डॉ. आनंद यादव	ग्रामीण साहित्यः स्वरूप आणि समस्या	२०१६	मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे
३.	डॉ. नागनाथ कोत्तापल्ले	ग्रामीण साहित्यः स्वरूप आणि शोध	१९८५	स्वरुप प्रकाशन, इंदौर
४.	डॉ. वासुदेव मुलाटे	ग्रामीण कथाः स्वरूप आणि विकास		स्वरुप प्रकाशन, इंदौर
५.	भास्कर चंदनशीव	भूमी आणि भूमिका	१९९२	साकेत प्रकाशन, औरंगाबाद
६.	नरहर कुरुंदकर	धार आणि काठ	१९७१	देशमुख प्रकाशन, पुणे.
७.	बापट प्र.वा. व गोडबोले ना.वा	मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास	१९७३	व्हीनस प्रकाशन, पुणे
८.	रवींद्र ठाकुर	मराठी कादंबरीः समाजशास्त्रीय समीक्षा	२००७	दिलीपराज प्रकाशन, पुणे
९.	हरिशचंद्र थोरात	कादंबरीविषयी	२००६	पद्मगंधा प्रकाशन, पुणे
१०.	कुसुमावती देशपांडे	मराठी कादंबरी : पहिले शतक	१९५३	न्यू भारत प्रिटीग प्रेस, मुंबई
११.	भालचंद्र नेमाडे	टीका स्वयंवर	२००१	साकेत प्रकाशन, औरंगाबाद
१२.	वि.का. राजवाडे	कादंबरी	१९५०	आनंद प्रेस, सातारा
१३.	किशोर सानप	प्रायोगिक कादंबरी आणि श्याम मनोहर	१९९८	बजाज पब्लिकेशन, अमरावती

१४.	आशा सावदेकर	नारायण सीताराम फडके	१९९५	साहित्यिक अकादमी, नवी दिल्ली
१५.	विलास सारंग	आतंक	१९९९	शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर
१६.	उषा हस्तक	कादंबरी आणि मराठी कादंबरी	१९९३	साहित्यसेवा प्रकाशन,औरंगाबाद
१७.	इंद्रजीत भालेराव, श्रीकांत उमरीकर	'ओ'	१९३६	प्रकाशन तपशील उपलब्ध नाही
१८.	इंद्रजीत भालेराव, श्रीकांत उमरीकर	'हिरवे गुलाब'	१९४३	वीणा प्रकाशन, नागपूर
१९.	इंद्रजीत भालेराव, श्रीकांत उमरीकर	'बाबू दडके'	१९४४	वीणा प्रकाशन, नागपूर
२०.	इंद्रजीत भालेराव, श्रीकांत उमरीकर	'उत्पात'	१९४५	ध्रुव प्रकाशन, हैदराबाद
२१.	इंद्रजीत भालेराव, श्रीकांत उमरीकर	'म्हणे लढाई संपली'	१९४६	नागपूर प्रकाशन, नागपूर
२२.	इंद्रजीत भालेराव, श्रीकांत उमरीकर	'जगाला कळलं पाहिजे'	१९४९	नागपूर प्रकाशन, नागपूर
२३.	इंद्रजीत भालेराव, श्रीकांत उमरीकर	'आडगावचे चौधरी'	१९५४	कुलकर्णी ग्रंथागार, पुणे

संशोधक

स्वाती अशोकराव नवरे

मार्गदर्शक

डॉ. पंढरीनाथ नारायणराव धोंडगे

मराठी विभाग

ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर जि. परभणी